# प्रकरण – 2

# रूग्णालयाची रचना, कार्य व कर्तव्ये

2.1 रूग्णालयाची उद्दिष्टे

जनतेला उत्तम दर्जाची द्वितीय स्तरीय सर्वांगीण आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, रोगाबाबत उपचार करणे, प्रतिबंधात्मक कार्यवाही करणे व त्यावर उपाययोजना करणे.

2.2 रूग्णालयाचे ध्येय

जनतेला आपुलकीने व आदरयुक्त उत्तम प्रकारची आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे.

2.3 दिवालीबेन मोहनलाल मेहता रूग्णालय जे 'माँ' रूग्णालय म्हणून ओळखले जाते. हे रूग्णालय एम/पि चम विभागात वसलेले असून साधारण आसपासच्या 10 ते 12 लाख लोकांना त्यच्या सेवेचा लाभ घेता येतो. सुरूवातीला हे रूग्णालय एका शाळेच्या इमरतीत दवाखान्याच्या स्वरूपात सर्वोदय ट्रस्ट, घाटकोपर यांनी दिलेल्या भूखंडावर 27/06/1971 रोजी चालु करण्यात आले. त्यांच्या आईच्या स्मरणार्थ दिवालीबेन मोहनलाल मेहता (माँ रूग्णालय) असे नामकरण करण्यात आले. ह्या इमारतीला तळमजला व तीन मजले आहेत. एकंदर बांधकामाचे क्षेत्र 1303 चौ. मिटर.

| | | |
|---|---|---|
| 1972 | – | वैद्यकीय शल्यचिकित्सा, स्त्री रोग, बालरोग या विभागांची सुरूवात झाली. |
| 1976 | – | त्वचा व गुप्तरोग विभाग सुरू झाले. |
| 1977 | – | क्षयरोग, बाह्यरूग्ण विभाग सुरू झाले. |
| 1979 ते 80 | – | कान, नाक, घसा व नेत्र विभागाचा बाह्यरूग्ण विभाग सुरू झाला. |
| 1980 | – | कान, नाक, घसा यांचा आंतररूग्ण विभाग सुरू झाला. |
| 1981 | – | रूग्णालयाच्या समोरील 1098.5 चौ. मि. मापाचा भूखंड सर्वोदय ट्रस्ट यांच्याकडून खरेदी करण्यात आला व त्यावर विस्तारित इमारतीचे काम सुरू करण्यात आले. कारण त्यावेळेस रूग्णालयातील जवळ जवळ सर्व खाटा भरलेल्या असत. |

1993 – विस्तारित इमारतीचा प्रस्ताव पाठविण्यात आला.

1998 – फेज 1 चे बांधकाम पूर्ण झाले.

2001 – फेज 1 चे बांधकाम पूर्ण झाले. आता पूर्णपणे दोन इमारती (फेज 1 व फेज 2) कार्यरत आहेत व दोन उद्वाहने आहेत. तळमजला, 5 मजले, दोन उद्वाहने, संपूर्ण क्षेत्र 3470 चौ. मि.

परंतु जुन्या इमारतीतील औषध भांडार व शल्यक्रियागारात क्ष किरण विभाग व इतरत्र खुपच गळती असल्याने तसेच महापालिकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करून वरिष्ठ पातळीवर जुन्या इमारतीतील सध्या कार्यरत असलेल्या सोयी नवीन विस्तारित इमारतीत हलविण्यात याव्यात असा निर्णन्य झाला.

नवीन इमारतीचा उद्घाटन सोहळा 17 मार्च 2005 रोजी संपन्न झाला व रूग्णालय नवीन इमारतीत संपूर्णपणे कार्यरत झाले.

2.4 सर्वसामान्य जनतेस उत्तम आरोग्य सेवा नम्रतेने व अतिथ्यकारकरित्या उपलब्ध करून देणे.

2.5 रूग्णालयाच्या मुख्य आरोग्य सेवा

बाह्यरूग्ण विभाग सकाळी 8.00 पासून दुपारी 4.00 पर्यंत कार्यरत असतो.

**रूग्णालयाचे विविध बाह्यरूग्ण विभाग**

| क्रमांक | विभाग | कामाचे दिवस व वेळ |
|---|---|---|
| 1 | वैद्यकीय | सर्व कामाचे दिवस. सकाळी 8.30 ते 12.00 |
| 2 | बाल्य रूग्ण | सर्व कामाचे दिवस. सकाळी 8.30 ते 12.00 |

| | | |
|---|---|---|
| 3 | शल्यक्रिया | सर्व कामाचे दिवस. सकाळी 8.30 ते 12.00 |
| 4 | कान, नाक, घसा | मंगळवार व शुक्रवार दुपारी 1 ते 3 |
| 5 | नेत्र रूग्ण विभाग | मंगळवार, गुरूवार, शुक्रवार सकाळी 8.30 ते 11.30 |
| 6 | स्त्री रोग व कुटुंब नियोजन | मंगळवार व शुक्रवार दुपारी 1 ते 3 |
| 7 | लसिकरण | गोवर प्रतिबंधक लस मंगळवारी दिली जाते. पोलिओ, डी.पी.टी. लस सर्व दिवस दिली जाते. बी.सी.जी. लस सकाळी 8.30 ते 12.00 |
| 8 | दुपार बाह्य रूग्ण विभाग (सर्वसाधारण बाह्यरूग्ण विभाग) | दुपारी 1.30 ते 3.30 सर्वसाधारण बाह्य रूग्ण विभाग |
| 9 | लोकसेवा संगम कुष्टरोग बाह्यरूग्ण विभाग | गुरूवारी दुपारी 1 ते 3 पर्यंत |
| 10 | तातडीची सेवा लागणारे रूग्ण कर्तव्यावरील वैद्यकीय अधिकारी पाहतात. | कर्तव्यावरील वैद्यकीय अधिकारी पाहतात. |

**रूग्णालयात देण्यात येणाऱ्या इतर सेवा**

| | | |
|---|---|---|
| **1** | प्रयोग ाळा | सकाळी 8.00 ते दुपारी 4.00 |
| **2** | क्ष–किरण सेवा | सकाळी 8.00 ते दुपारी 4.00 |
| **3** | हृदय स्पंदन आलेख | सकाळी 8.00 ते दुपारी 4.00 |

| | | |
|---|---|---|
| **4** | समाजसेवा कार्यालय | सकाळी 8.00 ते दुपारी 4.00 |

**आंतर रूग्ण खाटा**

| क्र. | विभाग | स्त्री | पुरूष | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | वैद्यकीय विभाग | 6 | 14 | 20 |
| 2 | शल्यक्रिया चिकित्सा विभाग | 6 | 14 | 20 |
| 3 | स्त्री रोग विभाग | 10 | — | — |
| 4 | बाल्य विभाग | — | — | 20 |
| 5 | कान, नाक, घसा विभाग | 1 | 1 | 2 |
| 6 | नेत्र विभाग | 1 | 1 | 2 |
| | **एकूण खाटांची संख्या** | 24 | 30 | 74 |

2.7 शस्त्रक्रियागार — 1
शल्यचिकित्सा, स्त्री रोग, कान, नाक, घसा व नेत्रशल्य.

1. रूग्णवाहिका सेवा — 24 तास उपलब्ध.
1. शववाहिनी सेवा — शताब्दी रूग्णालय येथे स्थानबद्ध.
   पथ्यआहार — रूग्णालयाच्या स्वयंपाकघरातून बनविला जातो.

2.8 रूग्णालयाची कार्यक्षमता वाढविण्याकरिता जनतेकडून वेळोवेळी सूचना येण्याची आवश्कयता आहे.

2.9 जनसेवा योगासाठी केलेल्या पद्धती व व्यवस्था

1) दक्षता समिती महापालिकेचे त्यांच्या संबंधित विभागाचे नगरसेवक व अभाासकीय प्रतिनिधी यांचा सहभाग.
2) प्रभाग समिती महानगरपालिकेचे संबंधित नगरसेवक आणि काही निवडक लोकप्रतिनिधी यांचा सहभाग.

3) अ ासकीय संस्था – लायन्स क्लब.

2.10 कार्यप्रणालीवर देखरेख व लोकांच्या तक्रारींचे निरसन करण्यासाठी असलेली संस्था.

अ) तक्रार वही

ब) प्रत्येक कक्षामध्ये दुपारी 1.30 ते 3.30 या वेळेत वैद्यकीय अधिकारी व परिसेविका तक्रार निवारणासाठी उपलब्ध असतात. तसेच ठिक–ठिकाणी लावलेल्या फलकांवरून रूग्ण प्रमुख वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे संपर्क करून तक्रार करू शकतात.

क) दक्षता समितीची बैठक वेळोवेळी घेतली जाते.

ड) माता, बाल कल्याण, आरोग्य समिती, महापालिकेच्या सभेमध्ये जनतेच्या तक्रारींची दखल घेतली जाते.